**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 08 वाजून 30 मिनिटं**

**दिनांकः21.08.2024** **वारःबुधवार**

---

ठळक बातम्या

1 )पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून तीन दिवसाच्या पोलंड आणि युक्रेन च्या दौऱ्यावर

2 ) भारत आणि मलेशिया दरम्यान विविध क्षेत्रात सहकार्य करार

3 ) कोलकाता इथल्या महिला डॉक्टर बलात्कार आणि हत्या प्रकरणा संबंधी समाज माध्यमावर प्रसिद्ध करण्यात आलेल पीडित महिला संदर्भातील छायाचित्र आणि व्हीडियो तत्काळ काढून टाकण्याचे सर्वोच्च न्यायलयाने निर्देश

4 ) केंद्रिय लोकसेवा आयोगातर्फे समांतर भरतीबाबतची जाहिरात रद्द
आणि

5 ) देशातल्या इंटरनेट वापरकर्त्यांची संख्या 95 कोटींवर तर दूरध्वनी वापरकर्त्यांची संख्या 120 कोटींवर

पंतप्रधान

पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून तीन दिवसाच्या पोलंड आणि युक्रेन च्या दौऱ्यावर जात आहेत . पोलंडची राजधानी वारसॉ इथ त्यांच स्वागत करण्यात येणार आहे. पोलंड चे पंतप्रधान डोनाल्ड टस्क आणि राष्ट्रपती आंद्रेज डूडा यांची भेट घेऊन ते चर्चा करणार आहेत. तसच पंतप्रधान मोदी पोलंड मधील भारतीयांशी तसच व्यापारी आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. गेल्या 45 वर्षात भारताचे पंतप्रधान प्रथमच पोलंड देशाला भेट देत असून दोन्ही देशाच्या धोरणात्मक द्विपक्षीय संबंधाना 70 वर्ष पूर्ण होत असताना पंतप्रधान मोदी पोलंडला भेट देत आहेत. पोलंड आणि भारतातील जामनगर आणि कोल्हापूर यांच्यातील ऋणानुबंध जपणाऱ्या दोन स्मृति स्थळांना ही मोदी या दौऱ्यात भेट देणार आहेत. त्यानंतर युक्रेनचे पंतप्रधान ब्लादिमिर झेलेनसकी यांच्या निमंत्रणावरून पंतप्रधान मोदी 23 तारखेला युक्रेनला जाणार असून , 1992 नंतर प्रथमच भारतीय पंतप्रधान युक्रेन भेटीवर जात आहेत. यावेळी ते युक्रेनचे पंतप्रधान ब्लादिमिर झेलेनस्की यांच्या बरोबर अनेक द्विपक्षीय मुद्दयांवर चर्चा करणार असून तिथल्या भारतीयांशी आणि

विद्यार्थ्यांशीही संवाद साधणार आहे. रशिया युक्रेन दरम्यान सुरू असलेल्या  युद्धाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानाचा हा दौरा भारतच्या दृष्टीने महत्वाचा मानला जात आहे.

मलेशिया

भारत आणि मलेशिया दरम्यान काल विविध क्षेत्रात सहकार्य करण्यासाठी अनेक करार करण्यात आले.  पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मलेशियाचे प्रधानमंत्री दातो सेरी अन्वर बीन इब्राहीम यांच्यात काल नवी दिल्लीत शिष्टमंडळ स्तरावर चर्चा झाली. त्यानंतर विविध करारांवर दोन्ही देशांनी स्वाक्षरी केली. श्रम आणि रोजगार, आयुर्वेद आणि पारंपरिक औषधी, डिजिटल तंत्रज्ञान, संस्कृती, पर्यटन, तसंच युवा कल्याण आणि क्रीडा या क्षेत्रांबरोबरच ,सामान्य प्रशासन, प्रशासकीय सुधारणा, आणि परस्पर सहकार्याबाबतही दोन्ही देशात करार करण्यात आले.यानंतर माध्यमांसाठी जाहीर करण्यात आलेल्या प्रसिद्धीपत्रकात  भारत आणि मलेशियानं धोरणात्मक भागीदारीत वाढ करण्याचा निर्णय घेतल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हंटल आहे. दोन्ही देशांमधील धोरणात्मक संबंधाना 10 वर्ष पूर्ण होत असून गेल्या दोन वर्षात त्यात जास्त ऊर्जा आणि मजबूती आल्याचही मोदी यांनी म्हंटल आहे. गेल्या वर्षात मलेशियाने भारतात 5 बिलियन डॉलर्सची गुंतवणूक केली असल्याची माहितीही मोदी यांनी दिली.

कोलकाता प्रकरण

कोलकाता इथल्या महिला डॉक्टर वरील बलात्कार आणि हत्या प्रकरणा संबंधी समाज माध्यमावर प्रसिद्ध करण्यात आलेल पीडित महिला संदर्भातील नाव , छायाचित्र आणि व्हीडियो तत्काळ काढून टाकण्यात यावेत असे निर्देश सर्वोच्च न्यायलयाने दिले आहेत. यासंदर्भात दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सुनावणी करताना सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने हे आदेश दिले . देशातल्या डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसंबंधी उपाययोजना सुचवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयानं राष्ट्रीय कृती दलाची स्थापना केली आहे. या कृती दलाला तीन आठवड्यात हंगामी अहवाल आणि दोन महिन्यात अंतिम अहवाल सादर करण्याचे निर्देशही  सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालच्या खंडपीठानं यावेळी दिले. या राष्ट्रीय कृती दलात देशातील निवडक डॉक्टर्स राहणार असून ते डॉक्टर्स , महिला डॉक्टर आणि आरोग्य कर्मचारी यांच्या सुरक्षेसाठीच्या  उपाययोजना सुचवणार आहेत. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने  हे प्रकरण नीट न हातळल्याबद्दल पश्चिम बंगाल सरकार आणि संबंधित रुग्णालय प्रशासन यांच्या बद्दल नाराजी व्यक्त केली.

तपास पथक

महाराष्ट्रात ठाणे जिल्ह्यात बदलापूर इथ झालेल्या दोन लहान मुलींच्या लैंगिक अत्याचार प्रकरणी राज्यसरकारने   विशेष तपास पथकाची स्थापना केली असून, वरिष्ठ महिला पोलिस  अधिकारी आरती सिंग यांच्या नेतृत्वाखाली हा तपास केला जाणार आहे.  या प्रकरणाचा खटला  जलदगती

न्यायालयात चालवण्याच्या दृष्टीने प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश  ठाण्याच्या पोलिस आयुक्तांना दिल्याच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सांगितल. दरम्यान या प्रकरणी न्याय मिळावा आणि जबाबदार प्रशासनावर सरकारने  कारवाई करावी यासाठी  काल बदलापूर इथ पालक आणि सर्वसामान्य नागरिकांनी जोरदार आंदोलन केल.

नेपाळ वीज

नेपाळ मधून 12 जल विद्युत प्रकल्पामधून 251 मेगा वॅट वीज आयात करायला भारताच्या सीमापार व्यापार प्राधिकरणने  परवानगी दिली आहे. नेपाळ च्या कडून  बिहारसाठी ही वीज प्रथमच कराराच्या माध्यमातून खरेदी करण्यात येणार आहे. यामुळे आता भारताच्या कडून करण्यात येणाऱ्या वीज आयंतीत वाढ झाली असून ,  नेपाळमधील 28 प्रकल्पातून  941 मेगावॅट वीज खरेदी केली जाणार आहे.  यापूर्वीच नेपाळ वीज निर्यात करणारा महत्वाचा  देश बनला असून , मागील आर्थिक वर्षात नेपाळणने  सुमारे 14 अब्ज डॉलर्सची वीज निर्यात केली आहे

युपीएससी-समांतर-भर्ती

केंद्रिय लोकसेवा आयोगानं समातर भरतीबाबतची जाहिरात रद्द केली आहे. कार्मिक आणि प्रशिक्षण मंत्रालयाच्या आदेशानंतर काल आयोगानं ही जाहिरात मागं घेतली. युपीएससी नं नुकतीच केंद्रिय मंत्रालयातले सहसचिव, संचालक आणि उप सचिवांच्या 45 जागांवरील भरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती. याला विरोधी पक्षांनी आक्षेप घेतला होता.समांतर भरतीची प्रक्रिया समानता आणि सामाजिक न्यायाच्या तत्त्वांवर आधारित असावी. विशेषतः आरक्षणाच्या तरतूदींशी सुसंगत असावी यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारचा ठाम विश्वास आहे असं केंद्रिय कार्मिक आणि प्रशिक्षण मंत्री डॉक्टर जितेंद्र सिंह यांनी युपीएससी च्या अध्यक्ष प्रीती सुदन यांना पाठवलेल्या पत्रात म्हटलं आहे.पंतप्रधानांनी नेहमीच सामाजिक न्यायावर भर दिला असून सरकारच्या विविध उपक्रमांमुळे समाजातल्या मागास वर्गाची प्रगती होण्यात मदत झाली आहे असं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे.

इंटरनेट-वापरकर्ते

देशातल्या इंटरनेट वापरकर्त्यांची संख्या 88 कोटीवरुन 95 कोटी 40 लाखांवर गेली आहे. तर ब्रॉडबँड ग्राहकांची संख्या 92 कोटी 40 लाख झाली आहे. 2023-24 या आर्थिक वर्षात इंटरनेट वापरकर्त्यांमध्ये 7 कोटी 30 लाख आणि ब्रॉडबँड ग्राहकांच्या संख्येत 7 कोटी 70 लाखांनी वाढ झाल्याची माहिती दूरसंवाद मंत्रालयानं दिली आहे. देशातल्या दूरध्वनी वापरकर्त्यांमध्येही 3 कोटींची वाढ झाली असून ही संख्या 120 कोटींवर गेल्याचं भारतीय दूरसंवाद प्राधिकरणाच्या वार्षिक अहवालात नमूद करण्यात आलं आहे.

पद्मनाभन
माजी लष्करप्रमुख जनरल सुंदरराजन पद्मनाभन यांना काल भारतीय लष्करातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. चेन्नई इथं काल त्यांच्या पार्थिव देहावर संपूर्ण लष्करी इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. अनेक आजी माजी लष्करी अधिकारी आणि कर्मचारी यावेळी उपस्थित होते. सहकारी आणि कनिष्ठ यांच्यात पॅडी या नावानं ओळखल्या जाणाऱ्या पद्मनाभन यांनी 43 वर्षांपेक्षा जास्त काळ देशसेवा केली. 2000 ते 2002 या काळात त्यांनी लष्करप्रमुख म्हणून काम केलं होतं.

बांग्लादेश महिला क्रिकेट
महिलांची 20 षटकांची विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धा संयुक्त अरब अमीरातींमध्ये घेण्याचा निर्णय आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं घेतला आहे. याआधी ही स्पर्धा बांग्लादेशात होणार होती. स्पर्धेचं अधिकृत यजमानपद मात्र बांग्लादेश क्रिकेट मंडळाकडेच असेल. दुबई आणि शारजाह मध्ये 3 ते 20 ऑक्टोबर या कालावधीत या स्पर्धेतले सामने खेळले जातील. आयसीसीचे प्रमुख कार्यवाह जेफ अलार्डिस यांनी एका निवेदनाद्वारे हा निर्णय कळवला आहे.

याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार.